TV VISION LTD
A SRI ADHIKARI BROTHERS ENTERPRISE

September 7, 2020

To
**The Manager – CRD,**
**BSE Limited**
Phiroze Jeejeebhoy Towers,
2nd Floor, Dalal Street, Fort,
Mumbai – 400 001

**Scrip Code: 540083**

Dear Sir(s),

**Sub: Submission of Newspaper Advertisement for dispatch of annual report of the 13th Annual General Meeting of the Company**

With reference to the above captioned subject and pursuant to provision of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we wish to inform you that the Company has published the newspaper advertisement for the details of completion of dispatch of annual report alongwith the evoting details and other related information, in the following two newspapers:

1. *Financial Express (one English Newspaper)*
2. *The Global Times (one Marathi Newspaper)*

The copy of newspaper advertisement is enclosed herewith for your records.

Kindly acknowledge the receipt of the same.

Thanking You.
Yours faithfully,
For **TV Vision Limited**

**Shilpa Jain**
**Company Secretary & Compliance Officer**
**ACS No.: 24978**

Encl: A/a

# हायवेच्या उंच-सखलपणामुळे अपघाताच्या घटना

कुडाळ : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर येथील उद्यमनगरमधील टीव्हीएस शोरुम समोरचा रस्ता समांतर न ठेवता मधोमध काही अंतरापर्यंत दोन भाग करण्यात आले आहेत. त्यामुळे दुचाकीस्वाराना अंदाज येत नसल्याने तेथे अपघाताच्या घटना वारंवार घडत आहेत. रात्रीच्यावेळी मोठी दुर्घटना होण्याची भीती नाकारता येत नाही.

त्याच ठिकाणी या नवीन रस्त्याला खड्डे पडले आहेत. जीव मुठीत धरून दुचाकी चालवावी लागते. रस्त्याची उंची न वाढविल्याने पाणीही साचते. हायवे ठेकेदाराच्या हलगर्जीपणाबाबत प्रवाशांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे. राजकीय नेतेही गप्प राहून ठेकेदाराच्या मनमानीला अप्रत्यक्षरित्या पाठिंबा देत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

महामार्ग चौपदरीकरण काम घाईगडबडीत आटोपताना येथील उद्यमनगर परिसरात ठेकेदाराच्या निकृष्ट कामाचे दर्शन होते. नवीन रस्त्याची अतिशय दुर्दशा झाली आहे. टीव्हीएस शोरुम समोरच्या दुपदरी रस्त्याला डांबरीकरण करण्यात आले. तेथे डांबराचे काही अंतरापर्यंत दोन थर ठेवले असून उंच-सखलपणा निर्माण झाला आहे. दुसऱ्या बाजूचा मार्ग काँक्रिटचा तयार केला असून त्यावरून वाहतूक सुरू केली नाही. त्यामुळे डांबरीकरण केलेल्या या दुपदरीवरून दोन्ही बाजूची वाहतूक सुरू आहे.

वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. रस्ता समांतर नसल्याने या दुपदरीच्या मध्यभागी दुचाकी उतरविताना व चढवताना घसरुन अपघाताच्या घटना घडत आहेत. रात्रीच्यावेळी त्याचा अंदाज येत नाही. आतापर्यंत झालेल्या अपघातात सुदैवाने किरकोळ दुखापतीवरच निभावले. मोठी दुर्घटना होण्याची शक्यता असतानाही हायवे ठेकेदार दुर्लक्ष करीत आहे.

त्याच भागात या नवीन रस्त्यावर खड्डे पडले असून वाहनधारकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्याच ठिकाणी गटार खोदाई करण्यात आली नाही. पावसाचे पाणी रस्त्यावर साचत आहे. तेथीलही दुरवस्था पाहता तो चौपदरीकरण रस्ता आहे का?, असा प्रश्न पडत आहे.

या महामार्गाच्या ठिकाणी दुतर्फा पावसाच्या पाण्याचा प्रवाह जास्त असतो. तेथे गटार खोदून पाण्याचा निचरा करण्यासाठी ठेकेदाराने उपाययोजना केली नाही. त्याठिकाणी रस्त्याची उंची वाढविणे आवश्यक होती. मग पाण्याचा निचरा झाला असता.

या रस्त्यावरून दुचाकीस्वार जीव मुठीत धरून वाहन चालवितात, तरीही काहीवेळा रस्त्याच्या या दुर्दशेमुळे अपघात घडतात. ठेकेदार प्रतिनिधी व हायवे अधिकारी यांची या महामार्गावरून नेहमी ये-जा असते. पण ते याकडे गांभीर्याने पाहत नाहीत. तेथील कामही अर्धवट स्थितीत आहे. ठेकेदार मनमानी काम करीत असल्याने वाहनधारक व नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे. लॉकडाऊननंतर दीड-दोन महिन्यांनी ठेकेदाराने पुन्हा काम सुरू केले, पण घाईगडबडीत काम आटोपते घेण्याच्या तयारीत असल्याने त्यात दर्जेदारपणा



दिसत नाही. भविष्यात ते किती वर्षे टिकणार?, हाही प्रश्नच आहे.

लोकांनी रस्त्याच्या समस्येकडे लक्ष वेधल्यानंतर लोकप्रतिनिधी जागेवर जाऊन अधिकारी व ठेकेदाराला सूचना करतात. त्यांच्यासमोर माना डोलावतात. मात्र, पुन्हा 'येरे माझ्या मागल्या', असेच चित्र पाहायला मिळते. लोकप्रतिनिधींचा वचक नाही. ठेकेदाराच्या निकृष्ट कामाबाबत सत्ताधारी त्याच्यावर कारवाई करण्याची भाषा करून जनतेची दिशाभूल करीत आहेत. ठेकेदार आपल्या मर्जीनुसारच काम करीत आहे. सुरुवातीला एखाद्या समस्येबाबत आक्रमक होणारे विरोधकही नंतर बोलत नाहीत. राजकीय आशीर्वादामुळे ठेकेदार बेजबाबदारपणे वागत असल्याचा आरोप सर्वसामान्य जनता करीत आहे. कोट्यवधी रु. निधी खर्च होत असलेल्या या महामार्गावरून सुखकर प्रवास करायला मिळावा, हीच लोकप्रतिनिधींकडून त्यांना अपेक्षा आहे.

# धारण करा रौद्रावतार, भस्म करा कोरोनाला!

कुडाळ : गणेशोत्सवातील देखाव्यांमध्ये त्या-त्यावेळच्या घटनांचे प्रतिबिंब पाहायला मिळते. कोरोना महामारीने अवघ्या जगाला विळखा घातला असताना यंदाच्या गणेशोत्सवात त्याची दखल घेण्यात आली नसती, तर नवलच. कुडाळ तालुक्यातील बिबवणे-मांगलेवाडी येथील दशावतारी युवा कलाकार व गणेश मूर्तीकार विघ्नराजेंद्र उर्फ बच्चू कोंडुरकर यांनी आपल्या गणपतीसमोर साकारलेला देखावा लक्षवेधी ठरला आहे. जीव धोक्यात घालून कोरोनाशी लढणाऱ्या 'कोरोना योद्धय़ां'ना यातून मानाचा मुजरा करण्यात आला आहे. पुराणातील कथेचा आधार घेत कलियुगातील असूर (कोरोना)ला रौद्रावतार धारण करून भस्म करा, असे साकडे त्यांनी गणपतीला घातले आहे.

विघ्नराजेंद्र यांची गणपती शाळा आहे. हा युवा कलाकार गणपतीसमोर दरवर्षी वैशिष्टय़पूर्ण देखावे साकारतो. यावर्षी त्यांचा गणपती सतरा दिवसांचा आहे. सध्या कोरोनाने सर्वत्र हाहाकार माजविला आहे. त्याच्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले जात आहेत. प्रशासन यंत्रणा आणि समाजातील बरेच घटक या लढाईत सहभागी झाले आहेत. विघ्नराजेंद्र यांनी यावर्षी देखाव्यासाठी 'कोरोना' हाच विषय निवडला आहे. कोरोनाशी लढणारे डॉक्टर्स, नर्सेस, पोलीस, सफाई कामगार आणि अदृश्यरुपाने थैमान घालणारा असूररुपी कोरोना असा देखावा साकारला आहे. या कोरोना व्हायरसला त्यांनी पुराणातील असूर म्हणून संबोधले आहे. त्या कथेचा संदर्भ देत तयार केलेली फ्लेक्स देखाव्यासमोर झळकत आहेत. त्यानुसार कृत, त्रेता व द्वापार या तीन युगात धर्म सतेज ठेवण्यासाठी देवाने विविध अवतार धारण केले आणि असुरांचा नाश केला. आज कलियुगात तोच देव डॉक्टर्स, नर्सेस, पोलीस, सफाई कामगार आणि या संकटकाळात एकमेकांना सहाय्य करणाऱ्या मानवाच्या रुपात वावरत आहे. अशा कोरोना योद्धय़ांना त्यांनी यातून मानाचा मुजरा केला आहे.

# झोपेचे कारण सांगून भेट नाकारली

सावंतवाडी : माठेवाडा येथील श्री देव दामोदर भारती मठात दफन केलेले श्रीकृष्ण गिरी यांचे पार्थिव हटविण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे सादर करण्यासाठी माठेवाडय़ातील रहिवासी प्रांताधिकारी सुशात खांडेकर यांच्याकडे शनिवारी गेले होते. परंतु खांडेकर झोपल्याचे कारण पुढे करून त्यांची भेट नाकारण्यात आली. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न असताना खांडेकर यांनी झोपेमुळे भेट नाकारली. खांडेकर यांच्या या कृतीचा रहिवाशांनी पत्रकार परिषद घेऊन निषेध केला. आता कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास प्रांताधिकारी त्याला जबाबदार राहतील, असा इशारा रहिवाशांनी दिला.

येथील आत्मेश्वर मंदिरात झालेल्या पत्रकार परिषदेला प्रभागातील नगरसेवक आनंद नेवगी, शुभांगी सुकी, उत्कर्षा सासोलकर, माजी नगरसेवक देवा टेमकर, रहिवासी अरुण वझे, आनंद मोघे, नंदू गावडे, किरण सिद्धये, बाळा चोणकर, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे वकील ऍड. समी खाजा आदी उपस्थित होते.

येथील माठेवाडय़ात गिरी कुटुंबयांनी श्रीकृष्ण गिरी यांच्या पार्थिवाचे देव दामोदर भारती मठात दफन केले. रहिवाशांचा त्याला विरोध आहे. यासंदर्भात त्यांनी पालिका मुख्याधिकारी, प्रांताधिकारी, पोलीस निरीक्षकांची भेट घेऊन पार्थिव हटविण्याची मागणी केली. मात्र, अद्यापही ते हटविण्यात आलेले नाही. यापूर्वी असा प्रसंग उद्भवला होता. त्यावेळी आपल्यासारखा निवाडा झाला. त्यानुसार पार्थिव हटवावे, यासाठी रहिवासी प्रांताधिकारी खांडेकर यांना भेटण्यास गेले होते. त्यावेळी मी झोपलो आहे. निवेदन स्वीकारणार नाही, असा निरोप रहिवाशांना मिळाला. त्यामुळे रहिवासी परत आले. त्यांनी पत्रकार परिषद घेऊन खांडेकर यांच्या या कृतीचा निषेध केला. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न असताना प्रांताधिकाऱयांनी भेट देणे आवश्यक होते. परंतु त्यांनी भेट नाकारली. ही त्यांची कृती योग्य नसल्याचे आनंद नेवगी, पुंडलिक दळवी यांनी सांगितले. पार्थिव हटविण्यासंदर्भात रविवारी सकाळी अकरा वाजता मुख्याधिकारी, नगराध्यक्ष घटनास्थळी येणार असल्याचे नेवगी यांनी सांगितले.

यावेळी पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे वकील समी खाजा यांनी गिरी कुटुंबियांची कृती बेकायदेशीर आहे. त्यांना पार्थिव हटविण्याबाबत नोटीस दिली आहे. देवस्थान समिती यासंदर्भात काही करू शकत नाही. प्रांताधिकारी, मुख्याधिकारी पार्थिव हटविण्याबाबत निर्णय घेऊ शकतात. गिरी हे केवळ पुजारी होते. परंपरेने ते मठाधिपती नाहीत. देवस्थान समितीची जागा आहे. या जागेत पार्थिव दफन करता येणार नाही. यापूर्वीच्या न्यायनिवाडय़ाच्या आधारे पार्थिव येथून हटविणे आवश्यक आहे, असे खाजा यांनी सांगितले. अशी घटना यापुढे घडू नये, यासाठी समितीतर्फे बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पार्थिव दफन केल्याने आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात. येथे त्यांना पार्थिव दफन करता येणार नाही. ते हटविले पाहिजे. तसे न झाल्यास होणाऱया परिणामांना प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा रहिवाशांनी दिला. प्रांताधिकाऱयांनी वेळीच निर्णय घेतला नाही. त्यामुळे प्रकरण चिघळले, असे रहिवाशांनी सांगितले.

# ...अन्यथा या बाटल्यांचे पार्सल जाईल एसीपींकडे

सावंतवाडी : शहरामध्ये गोवा बनावटीच्या अवैध दारूची विक्री तेजीत सुरू आहे. शहरातील गल्लीबोळात अनेक युवक दारू विक्री करत आहेत. शहराची साफसफाई करताना सफाई कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या दारू बाटल्यांमुळे हा प्रकार समोर आला. येत्या आठ दिवसात शहरातील हे प्रकार पोलिस निरीक्षक शशिकांत खोत यांनी बंद करावे, अन्यथा दारूच्या बाटल्याच पोलिस अधिक्षक दिक्षितकुमार गेडाम यांना कुरिअर करु, असा इशारा नगराध्यक्ष संजू परब यांनी आज येथे दिला.

नगराध्यक्ष परब यांनी आज पालिकेमध्ये आपल्या दालनात पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी शहरामध्ये गोवा बनावटीची अवैध दारू विक्रीवरुन पोलिस यंत्रणेला टार्गेट केले. यावेळी नगरसेवक आनंद नेवगी, मनोज नाईक, बंटी पुरोहित आदी उपस्थित होते. दरम्यान परब म्हणाले, 'लॉकडाऊनमध्ये राज्याच्या सीमा बंद असतानासुद्धा शहरामध्ये अनेकांनी गल्लीबोळात दारू विक्री करत, एकप्रकारे व्यवसाय सुरू केला.

पालिकेच्या माध्यमातून दररोज शहराची साफसफाई करताना ठिक-ठिकाणी दारूच्या बाटल्यांचा खच आढळून येऊ लागला. पोलिस यंत्रणेचा मात्र या सगळ्या प्रकाराकडे दुर्लक्ष असून शहरात सुरू असलेले हे प्रकार येत्या आठ दिवसात बंद नाही झाले, तर शहरात मिळणाऱ्या दारूच्या बाटल्या पोलिस अधीक्षकांना कुरिअर करण्यात येणार आहेत. शिवाय या सगळ्या प्रकाराकडे दुर्लक्ष करणाऱ्या पोलिस प्रशासनाच्या विरोधात येथील पालिकेच्या कौन्सिलमध्ये निषेधाचा ठरावही निश्चितपणे मांडला जाणार.'

# दुचाकींच्या धडकेत तिघे युवक ठार



कणकवली : मुंबई-गोवा महामार्गावर जानवली कृष्णनगरी येथे दोन दुचाकींमध्ये समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात तिघे युवक ठार, तर एक युवक गंभीर जखमी झाला. मयत तिघांमध्ये अदमापूर-कोल्हापूर येथील दोघे सख्खे चुलत भाऊ व तिसरा पाचल-राजापूर येथील आहे. पाचल येथीलच गंभीर जखमीवर पडवे येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हा अपघात शनिवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडला.

मृत झालेल्यांमध्ये भुदरगड तालुक्यातील अदमापूर येथील सात्तापा शिवाजी पाटील (26), अजय हिंदुराव पाटील (20) व पाचल येथील अस्लम कल्लोट (22) यांचा समावेश आहे. गंभीर जखमी युवकाचे नाव अश्रफ प्रफुल्लकर (25 पाचल, राजापूर) असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

शनिवारी दुपारच्या सुमारास अदमापूरहून सताप्पा शिवाजी पाटील व अजय हिंदूराव पाटील हे दोघे सख्खे चुलत भाऊ मोटारसायकलने (एमएच 08 क्यू 5752) ओरोस येथे पोलीस विभागात कार्यरत असलेल्या सताप्पाच्या बहिणीला भेटण्यासाठी येत होते. याच दरम्यान, अस्लम कल्लोट हा आपला सहकारी अश्रफ प्रफुल्लकर याच्यासमवेत मोटारसायकलने (एमएच 10 सीजी 3803) कणकवलीहून पाचलकडे जात होता. अस्लम कल्लोट याच्या बहिणीची कणकवलीमध्ये प्रसुती झालेली असल्याने तिला भेटून तो परतत होता.

जानवली कृष्णनगरी परिसरात हायवेचे काम सुरू असल्याने तेथे रस्ता एक दिशामार्ग आहे. दुपारच्या सुमारात या दोन्ही मोटारसायकल वेगात एकमेकांवर जोरदार आदळल्या. ही धडक एवढी जबरदस्त होती की चौघेही रस्त्यावर फेकले गेले. चौघांचीही डोकी रस्त्यावर आदळली. त्यामुळे रस्त्यावर अक्षरशः रक्ताचा सडा पडला होता. एकाचे हेल्मेटही दूरवर पडले होते. प्रत्यक्षदर्शींनी तातडीने रुग्णवाहिकेला बोलावून जखमींना रुग्णालयात हलविले. मात्र, एकाचा जागीच मृत्यू झाला होता. उपजिल्हा रुग्णालयात दुसऱयाचा मृत्यू झाला. त्यानंतर गंभीर जखमी असलेल्या दोघांना पडवे येथे हलविण्यात आले. तेथे उपचार सुरू करण्यापूर्वीच एकाचा मृत्यू झाला. तर गंभीर जखमी असलेल्यावर उपचार सुरू आहेत.

अपघातानंतर काहीकाळ वाहतूकही ठप्प झाली होती. पोलीस उपनिरीक्षक प्रकाश कदम यांच्यासह सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजू उबाळे, रुपेश गुरव, मनोज गुरव, महिला पोलीस हवालदार ममता जाधव यांनी पंचनामा केला. अपघाताच्या माहितीनंतर नांदगाव येथल रज्जाक बटवाले यांच्यासह नांदगाव नागरिक कणकवली उपजिल्हा रुग्णालयात दाखल झाले होते.

# ...तरच तुमच्या शाळेसाठी मुख्याध्यापक पद मंजूर होणार

कणकवली : प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षक संवर्गातील पदांसाठी संच मान्यतेच्या निकषांमध्ये सुधारणा केली आहे. त्यामुळे पुढील शैक्षणिक वर्षापासून ज्या शाळांमध्ये १५० पेक्षा अधिक पटसंख्या असल्यास मुख्याध्यापक पद मंजूर होणार आहे. त्या पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या मुख्याध्यापक पद रद्द केले जाणार असल्याने बहुतांशी शाळांमध्ये अडचणी निर्माण होणार आहेत. मुख्याध्यापक पदही अतिरिक्त ठरण्याची शक्यता आहे. केंद्राने शैक्षणिक धोरण जाहीर केल्यानंतर एकूणच शिक्षण पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे; मात्र शिक्षण हक्क कायदा विचारात घेऊन नव्या धोरणानुसार संचमान्यतालाही निकष बदलले आहे. पाचवी ते दहावीपर्यंत ज्या शाळा आहेत, अशा शाळांमध्ये एक ते १७५ पटसंख्या असल्यास पाच शिक्षक, त्यापुढे २१० पर्यंत पटसंख्येला ६ शिक्षक, २४५ पटाला ७ शिक्षक आणि २८० पटसंख्याला ८ शिक्षक दिले जाणार आहेत.

ज्या शाळांची पटसंख्या १७५ असेल तेथे ३५ विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक, असे प्रमाण शिक्षक पद निश्चित करताना राहील.

आठवी ते दहावी शाळांमध्ये एक ते १०५ पटसंख्येसाठी तीन शिक्षक पदे, १४५ साठी ४ शिक्षक, १८५ पटसंख्येसाठी ५ आणि २२५ पटसंख्येसाठी ६ शिक्षक पदे राहणार आहेत. या शाळांना १०५ विद्यार्थ्यांनंतर प्रति ४० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक, असे प्रमाण राहणार आहे. ज्या शाळांमध्ये आठ ते पंधरा शिक्षक पदे असतील तेथे एक क्रीडाशिक्षक आणि ज्या शाळांमध्ये ३२ ते ३९ पर्यंत शिक्षक पदे मंजूर असतील तेथे दोन क्रीडा शिक्षक दिले जातील.


**AMBA ENTERPRISES LIMITED**

**Regd.Off:** Unit No. 430, 4th Floor, Blue Rose Industrial Estate, Western Express Highway, Near Metro Mall, Borivali (East), Mumbai – 400 066.

**CIN : L99999MH1992PLC067004,**

Phone No. : 022-28701692 Email Id : ambaltd@gmail.com

Website : www.ambaltd.com

**Extract Of Statement Of UnAudited Financial Results For Year Ended 30th June 2020**

Amount in Rs.

| Sl. No. | Particulars | Quarter Ended June 2020 | Quarter Ended June 2019 |
|---|---|---|---|
| 1. | Total Income from Operations | 69,118,155 | 308,714,783 |
| 2. | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 2,518,909 | 4,000,241 |
| 3. | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 2,518,909 | 4,000,241 |
| 4. | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 2,255,886 | 2,865,215 |
| 5. | Total Comprehensive Income for the Period [ Comprehensive Profit/ (Loss) for the period (after tax) and other comprehensive income (after tax)] | 2,255,886 | 2,865,215 |
| 6. | Equity Share Capital (Face Value - Rs.10/- Per Share ) | 63,302,400 | 63,302,400 |
| 7. | Reserves (excluding Revaluation Reserve) | 108,100,955 | 97,325,932 |
| 8. | Earnings Per Shares | | |
| | 1. Basic: | 0.18 | 0.23 |
| | 2. Diluted: | 0.18 | 0.23 |

**Note:**

The above is an extract of the detailed format for Quarter ended 30, June,2020 Financial Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Other Disclosure Requirements) Regulations, 2015 i.e Board meeting held on 04.09.2020. The full format of the Quarterly Financial Results are available on the Bombay Stock Exchange website www.bseindia.com and at Company's website at www.ambaltd.com

**FOR AMBA ENTERPRISES LIMITED**
**Sd/-**
**KETAN MEHTA**
**Managing Director**
**DIN: 01238700**

**Date : 07.09.2020**
**Place : Mumbai**



**SAB EVENTS AND GOVERNANCE NOW Media Ltd**

**CIN: L22222MH2014PLC254848**

**Regd. Off.:** 7th Floor, Adhikari Chambers, Oberoi Complex, New Link Road, Andheri (West), Mumbai 400 053

E-mail: cs@governancenow.com; Website: www.governancenow.com;

Tel.: 022 – 4023 0711; Fax: 022 – 2639 5459

**NOTICE OF THE 7TH ANNUAL GENERAL MEETING AND E-VOTING INFORMATION**

**NOTICE** is hereby given that the 7th (Seventh) Annual General Meeting ("AGM") of the Members of the Company will be held on **Monday, September 28, 2020 at 4.30 p.m. (IST)** through Video Conferencing ("VC")/Other Audio Visual Means ("OAVM") facility, to transact the business as set out in the Notice of 7th AGM. In view of the continuing COVID-19 pandemic and restrictions imposed on the movement of people, the Ministry of Corporate Affairs ('MCA') vide its circular dated May 5, 2020 read with circulars dated April 8, 2020 and April 13, 2020 (collectively referred to as 'MCA Circulars') and SEBI vide its Circular no SEBI/HO/CFD/CMD1/CIR/P/2020/79 dated May 12, 2020 have permitted the holding AGM through VC/OAVM, without the physical presence of the Members. Accordingly, the 7th AGM of the Company is being held through VC / OAVM.

In compliance with the said Circulars, electronic copies of Notice and the Annual Report for the financial year 2019-20 have been sent to all the members whose e-mail IDs are registered as on **Friday, August 28, 2020**, with the Company / Registrar and Transfer Agents ('RTA') or with the Depository Participant(s). The copy of the same is also available on the website of the Company viz. http://www.governancenow.com/annual-report and on website of NSDL www.evoting.nsdl.com. The dispatch of Notice of the AGM through emails has been completed on **September 6, 2020.**

Pursuant to the provisions of Section 91 of the Companies Act, 2013, the register of members and share transfer books of the Company will remain closed from **Tuesday, September 22, 2020 to Monday, September 28, 2020 (both days inclusive)** for the purpose of 7th AGM.

The members holding share either in physical form or in dematerialized form as on **Monday, September 21, 2020 i.e. the cut-off date,** may cast their vote electronically on the business as set forth in the Notice of the AGM through the electronic voting system of NSDL ('remote e-voting'). Any person, who is a Member of the Company as on the cut-off date only, is eligible to cast his / her vote on all the resolutions set forth in the Notice of AGM.

The manner of voting remotely for members holding shares in dematerialized mode, physical mode and for member who have not registered their email ids is provided in the notice of AGM. The details will be available on the Company's website viz. www.governancenow.com.

All the members are hereby informed that:-

1. The business as set forth in the Notice of AGM may be transacted through remote e-voting or e-voting system at the AGM;
2. The cut-off date for determining the eligibility to vote through remote e-voting or e-voting system at the AGM shall be **Monday, September 21, 2020**;
3. Persons, whose name is recorded in the Register of Members or in the Register of Beneficial Owners maintained as on cut-off date, only shall be entitled to avail the facility of E-voting as well as e-voting system at the AGM;
4. The remote e-voting shall commence from **Friday, September 25, 2020 (9:00 am IST) and ends on Sunday, September 27, 2020 (5:00 pm IST)**;
5. The remote e-voting module shall be disabled by NSDL **(5:00 pm IST) on Sunday, September 27, 2020**;
6. Any person, who acquires shares and becomes a member of the Company after the dispatch of the notice and hold shares as on cut-off date i.e. Monday, September 21, 2020, may obtain login ID and password by sending a request on evoting@nsdl.co.in, to cast their vote electronically. However, if a person is already registered with NSDL for e-voting then the existing User ID and password can be used for casting their vote;
7. The members who have cast their vote by e-voting prior to the meeting may also attend the meeting but shall not be entitled to cast their vote again.

M/s. Manish Ghia & Associates, Company Secretaries, Mumbai, have been appointed as the Scrutinizer for scrutinizing the remote e-voting process and e-voting facility at the AGM in a fair and transparent manner. The results declared along with the Scrutinizer's Report within the prescribed period shall be displayed on the Company's website and also communicated to the Stock Exchanges.

For detailed instructions of remote e-voting and e-voting facility at AGM, Members may refer to the Section 'E-voting Process' in the Notice of 7th AGM. In case of queries or grievances pertaining to e-voting procedure, Members may refer the Frequently Asked Questions (FAQs) and e-voting manual available at www.evoting.nsdl.com or call on toll free no.: 1800-222-990 or send a request at evoting@nsdl.co.in or contact to Ms. Pallavi Mhatre, Manager – NSDL at pallavid@nsdl.co.in/ 022-24994545. Members may also write to the Company Secretary & Compliance Officer of the Company at cs@governancenow.com.

**For SAB Events & Governance Now Media Limited**
**Sd/-**
**Swity Gada**
**Company Secretary & Compliance Officer**
**(ACS No.: 59482)**

**Place: Mumbai**
**Date: September 07, 2020**



**TV VISION LTD**

**A SRI ADHIKARI BROTHERS ENTERPRISE**

**CIN: L64200MH2007PLC172707**

**Regd. Off.:** 4th Floor, Adhikari Chambers, Oberoi Complex, New Link Road, Andheri (West), Mumbai 400 053

E-mail: cs@tvvision.in; Website: www.tvvision.in;

Tel.: 022 – 4023 0000; Fax: 022 – 2639 5459

**NOTICE OF THE 13TH ANNUAL GENERAL MEETING AND E-VOTING INFORMATION**

**NOTICE** is hereby given that the 13th (Thirteenth) Annual General Meeting ("AGM") of the Members of the Company will be held on **Monday, September 28, 2020 at 2.45 p.m. (IST)** through Video Conferencing ("VC")/Other Audio Visual Means ("OAVM") facility, to transact the business as set out in the Notice of 13th AGM. In view of the continuing COVID-19 pandemic and restrictions imposed on the movement of people, the Ministry of Corporate Affairs ('MCA') vide its circular dated May 5, 2020 read with circulars dated April 8, 2020 and April 13, 2020 (collectively referred to as 'MCA Circulars') and SEBI vide its Circular no SEBI/HO/CFD/CMD1/CIR/P/2020/79 dated May 12, 2020 have permitted the holding AGM through VC/OAVM, without the physical presence of the Members. Accordingly, the 13th AGM of the Company is being held through VC / OAVM.

In compliance with the said Circulars, electronic copies of Notice and the Annual Report for the financial year 2019-20 have been sent to all the members whose e-mail IDs are registered as on **Friday, August 28, 2020**, with the Company / Registrar and Transfer Agents ('RTA') or with the Depository Participant(s). The copy of the same is also available on the website of the Company viz. http://www.tvvision.in/annual_report.php and on website of NSDL www.evoting.nsdl.com. The dispatch of Notice of the AGM through emails has been completed on **September 6, 2020.**

Pursuant to the provisions of Section 91 of the Companies Act, 2013, the register of members and share transfer books of the Company will remain closed from **Tuesday, September 22, 2020 to Monday, September 28, 2020 (both days inclusive)** for the purpose of 13th AGM.

The members holding share either in physical form or in dematerialized form as on **Monday, September 21, 2020 i.e. the cut-off date,** may cast their vote electronically on the business as set forth in the Notice of the AGM through the electronic voting system of NSDL ('remote e-voting'). Any person, who is a Member of the Company as on the cut-off date only, is eligible to cast his / her vote on all the resolutions set forth in the Notice of AGM.

The manner of voting remotely for members holding shares in dematerialized mode, physical mode and for member who have not registered their email ids is provided in the notice of AGM. The details will be available on the Company's website viz. www.tvvsion.in.

All the members are hereby informed that:-

1. The business as set forth in the Notice of AGM may be transacted through remote e-voting or e-voting system at the AGM;
2. The cut-off date for determining the eligibility to vote through remote e-voting or e-voting system at the AGM shall be **Monday, September 21, 2020**;
3. Persons, whose name is recorded in the Register of Members or in the Register of Beneficial Owners maintained as on cut-off date, only shall be entitled to avail the facility of E-voting as well as e-voting system at the AGM;
4. The remote e-voting shall commence from **Friday, September 25, 2020 (9:00 am IST) and ends on Sunday, September 27, 2020 (5:00 pm IST)**;
5. The remote e-voting module shall be disabled by NSDL **(5:00 pm IST) on Sunday, September 27, 2020**;
6. Any person, who acquires shares and becomes a member of the Company after the dispatch of the notice and hold shares as on cut-off date i.e. Monday, September 21, 2020, may obtain login ID and password by sending a request on evoting@nsdl.co.in, to cast their vote electronically. However, if a person is already registered with NSDL for e-voting then the existing User ID and password can be used for casting their vote;
7. The members who have cast their vote by e-voting prior to the meeting may also attend the meeting but shall not be entitled to cast their vote again.

M/s. Manish Ghia & Associates, Company Secretaries, Mumbai, have been appointed as the Scrutinizer for scrutinizing the remote e-voting process and e-voting facility at the AGM in a fair and transparent manner. The results declared along with the Scrutinizer's Report within the prescribed period shall be displayed on the Company's website and also communicated to the Stock Exchanges.

For detailed instructions of remote e-voting and e-voting facility at AGM, Members may refer to the Section 'E-voting Process' in the Notice of 13th AGM. In case of queries or grievances pertaining to e-voting procedure, Members may refer the Frequently Asked Questions (FAQs) and e-voting manual available at www.evoting.nsdl.com or call on toll free no.: 1800-222-990 or send a request at evoting@nsdl.co.in or contact to Ms. Pallavi Mhatre, Manager – NSDL at pallavid@nsdl.co.in/ 022-24994545. Members may also write to the Company Secretary & Compliance Officer of the Company at cs@tvvision.in.

**For TV Vision Limited**
**Sd/-**
**Shilpa Jain**
**Company Secretary & Compliance Officer**
**(ACS No.: 24978)**

**Place: Mumbai**
**Date: September 07, 2020**